# महाराष्ट्र विधानसभा
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे-**

**(अ)** तारांकित प्रश्न.

**(ब)** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**महिला व बालविकास मंत्री** : **"अंगणवाड्यांना मागील चार ते पाच महिन्यांपासून जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून धान्य पुरविले जात नसल्याबाबत"** या विषयावरील श्रीमती माधुरी मिसाळ व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३४७६४ ला दिनांक १६ मार्च,२०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(क)** अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या क्रमांक ४१६ ते ४२१ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**(१) मुख्यमंत्री** : शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २००७-२००८ या वर्षाचा अडतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** :

(अ) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन २००९-२०१० चा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतील.

(ब) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) ग्रामविकास मंत्री** :

(अ) महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन एकोणचाळीसावा अहवाल सन २००९-२०१० सभागृहासमोर ठेवतील.

(ब) जिल्हा परिषद ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ सातारा/

सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ जालना/परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषदांचे सन २०१०-२०११ चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल (२०१२-२०१३) सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**चार : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम ९७ अन्वये).**

**सहा : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्रीमती प्रणिती शिंदे,** सर्वश्री अबु आजमी, शरद गावित, रशीद ताहिर मोमीन, विवेक पंडित, विनोद घोसाळकर, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील विद्यापीठाअंतर्गत चालणाऱ्या बी.सी.ए. बी.बी.ए. व बी.सी.सी.ए. या अभ्यासक्रमात शिकणाऱ्या ओ.बी.सी., एस.बी.सी., व एन.टी., या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती गेल्या दीड वर्षापासून बंद केल्याची खळबळजनक बाब माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये निदर्शनास येणे, शासनाकडून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या यादीत या तिन्ही अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला नसल्यामुळेच केंद्राकडून निधी न मिळणे, तसेच तिन्ही अभ्यासक्रम व्यावसायिक नसल्याचा चुकीचा तर्क लावण्यात येणे, याबाबत शासनाचे कमालीचे दुर्लक्ष झालेले असून शासनाच्या चुकीमुळेच केंद्राकडून निधी न मिळाल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणे, या अभ्यासक्रमाच्या लाखो विद्यार्थ्यांकडून प्रवेश व ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म सामाजिक न्याय विभागाकडून भरुन घेण्यात येणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे त्यांना पुढील वर्षात प्रवेश न मिळणे, त्यामुळे मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांपुढे उच्च शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणे, गेल्या अडीच वर्षापासून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे शासनाने धोरण अवलंबिणे, एकीकडे तळागाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यासाठी व त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, याकरिता शासनाचे धोरण असणे व दुसरीकडे त्यांची शिष्यवृत्ती बंद करुन या धोरणाला फाटा देणे, याबाबत विद्यार्थ्यांनी शासनाकडे निवेदने देऊनही या विद्यार्थ्यांना न्याय न मिळणे, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.नाना पटोले,** डॉ. खुशाल बोपचे**,** वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे धान सन २०१०-११, २०११-१२ मध्ये धानाचे समर्थन मूल्यापेक्षा ३० रुपये कमी किंमतीने मार्केटिंग फेडरेशन

व आदिवासी महामंडळाने खरेदी केल्यामुळे नुकसान झालेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना फरकाची रक्कम मिळण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी (साकोली) यांनी प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना निवेदन देण्यात येणे, आयआर क्वालिटीला ए ग्रेड देण्याचे धोरण असताना त्या क्वालिटीला बी (सेकंड) ग्रेड देऊन खालीलप्रमाणे खरेदी करण्यात येणे,

| अ.क्र | वर्ष | खरेदी केंद्र | खरेदी केलेले धान | रु.३० फरकाच्या किमतीने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | २०१०-११ | भंडारा | ८ लाख ७९,००० क्वि. | २,६३,७०,०००/- |
| २) | २०१०-११ | गोंदिया | ४ लाख २५,२७७ क्वि. | १,२७,५८,३१०/- |
| ३) | २०१०-११ | गडचिरोली | ४ लाख ५०,६३६ क्वि. | १,३५,१९,११०/- |
| ४) | २०१०-११ | अहेरी | २ लाख २०,००० क्वि. | ६६,००,०००/- |
| | | **एकूण** | **१९ लाख ७४,९१४ क्वि.** | **५,९२,४७,४२०/-** |
| | | | | |
| १) | २०११-१२ | भंडारा | १४ लाख ९७,००० क्वि. | ४,४९,१०,०००/- |
| २) | २०११-१२ | गोंदिया | ४ लाख ५०,८३१ क्वि. | १,३५,२४,९३०/- |
| ३) | २०११-१२ | गडचिरोली | ३ लाख ५५,२०० क्वि. | १,०६,५६,०००/- |
| ४) | २०११-१२ | अहेरी | १ लाख ५०,००० क्वि. | ४५,००,०००/- |
| | | **एकूण** | **२४ लाख ५३,०३१ क्वि.** | **७,३५,९०,९३०/-** |

याप्रमाणे सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये धानाची एकूण खरेदी ४४,२७,९४५ क्वि. आणि ३० रुपये फरकाची होणारी किंमत १३,२८,३८,३५०/- एवढी असणे, शासनाने ठरवून दिलेल्या समर्थन मूल्यानुसार मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाने ३० रुपये फरकाने होणारी १३,२८,३८,३५०/- एवढी रक्कम धान उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात न आल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात शासनाविरुद्ध तीव्र स्वरुपाचा असंतोष निर्माण होणे, शासनाने त्वरित निर्णय घेऊन धान उत्पादक शेतकऱ्यांना फरकाची रक्कम देणे गरजेचे असणे, या गंभीर प्रश्नाबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री.संजय गावंडे,** वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील नागरीक्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा संबंधित नगरपरिषदांना हस्तांतरीत करण्याबाबत दिनांक २३ मार्च, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित होणे, तसेच मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ४६४०/२००८, दिनांक ३० जानेवारी, २००९ या याचिकेवर निर्णय देताना वरील शासन निर्णय अधोरेखित करणे, तथापि, तेल्हारा (जि.अकोला) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा अद्यापही तेल्हारा नगरपरिषदेकडे वर्ग न करता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांनी खासगी संस्थांकडे भाडेतत्वावर हस्तांतरीत केल्याचे उघडकीस येणे, त्याचप्रमाणे राज्यातील इतरही जिल्हा परिषदांच्या शाळा, नागरीक्षेत्रातील शाळा नगरपरिषदांकडे वर्ग न केल्याचे प्रकारही उघडकीस येणे, त्यामुळे शासनाच्या वरील निर्णयाकडे आणि मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाकडे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अकोला यांनी दुर्लक्ष केल्याचे सिध्द होणे, त्यामुळे अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंत्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणे, अकोला जिल्हा परिषदेच्या शाळा तेल्हारा नगरपरिषदेकडे वर्ग करण्यास झालेल्या

विलंबाचा अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना देणे, तथापि, सदरहू अहवाल अद्यापही सादर न होणे, या सर्व प्रकारामुळे तेल्हारा नगरपरिषदेच्या क्षेत्रातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण पसरणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**आठ : शासकीय विधेयके -**

**(१) पुर:स्थापनार्थ -**

**सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश)(सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे-**

(क) **सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. प्रविण दरेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे-विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(अ) सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक- १०- मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

**(ब) सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक- ११- महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ :-**

**(शुक्रवार, दिनांक १३ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली तथापि, पुढे ढकलण्यात आलेली विधेयके.)**

(१) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४५- महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (सुधारणा) विधेयक, २००९ - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.

(२) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१२ - श्री.मंगेश सांगळे, वि.स.स. यांचे.

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**
**( गतसत्रातील प्रलंबित ठराव) (क्रमांक १)**

**(१) श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचा ठराव क्र.२७१**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक २ ते ४)**

**(२) श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा ठराव क्र.१११**

"विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करुनही विदर्भातच मोठया

प्रमाणावर भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगढ राज्यात उद्योगांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे, परिणामी विदर्भाच्या वाटयाला प्रदूषण येवून विकासही न होणे, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्याची गरज लक्षात घेता तसेच भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री.प्रमोद जठार, वि.स.स. यांचा ठराव क्र.८८**

"तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(४) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८**

"राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १९ जुलै, २०१२.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.